जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

शुक्रवार दि.२६ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २४३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# मोदींकडे मांडायला कोणतेच मुद्दे नाहीत:त्यांच्या भाषणात सतत माझ्यावर टीका असते-शरद पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धाराशिव (वृत्तसंस्था)**

मोदी, अमित शहा यांचे भाषण ऐका, सर्वात जास्त माझ्यावर टीका असते. भाजपला त्यांचा पराभव आता स्पष्टपणे दिसतोय असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आणि प्रचारगीत आज प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यापूर्वी धाराशिवमध्ये ते पत्रकारांशी संवाद साधत होते.

यावेळी शरद पवार म्हणाले, ''मोदी असोत किंवा अमित शहा, त्यांच्या भाषणात सतत फक्त माझ्यावर, उद्धव ठाकरेंवर टीका असते. गेल्या १० वर्षांपासून ते सत्तेवर आहेत. त्या काळात त्यांनी काय केले? त्याचा लेखाजोगा त्यांनी आधी जनतेसमोर मांडायला पाहिजे, उगीच मागच्या गोष्टी काढू नये'' असे शरद पवार म्हणाले.पुढे शरद पवार यांनी मोदींवर टीका केली आहे. मोदींकडे मांडायला काही नाहीच, लोकांना सांगायला काही नाही म्हणून ते आमच्यावर आरोप करत आहेत. त्यांच्याकडे दुसरे काही उद्योग नाहीत. आता जनतेने मोदींचा पराभव करण्याचा निर्णय घेतला आहे असे पवार म्हणाले.दरम्यान, पवार साहेबांनी किती कोलांट्या उड्या मारल्या याचे व्हिडीओ दाखवले, तर अवघड होईल, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर नुकतीच टीका केली. त्याला आता शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. फडणवीस काय म्हणतात त्याला अर्थ नाही. आपला पराभव होतोय हे आता त्यांच्या लक्षात येतंय असे पवार म्हणाले.यापूर्वीही शरद पवार यांनी भाजप सरकार आणि मोदी यांच्यावर अनेकवेळा निशाणा साधला होता. कालच सोलापूरच्या माढा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची सभा झाली. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक जुना व्हीडिओ दाखवला. शरद पवारांनी नरेंद्र मोदींचे जुनं भाषण ऐकले. गेले दहा वर्षे देशात भाजपकडं सत्ता आहे. मोदींच्या हातात देशाचा कारभार आहे. मात्र निवडणुकीआधी दिलेली आश्वासने पाळली गेली नाहीत. लोकांची फसवणूक सुरू आहे'', असे शरद पवार म्हणाले होते.



## पुणे येथे ७९४ युनिट रक्तदान करून मानव एकता दिवस साजरा

# मनुष्य जीवन परोपकारासाठी समर्पित व्हावे-सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**




निराकार प्रभुने आम्हाला हे जे मानव जीवन दिले आहे त्याचा प्रत्यक क्षण मानवतेसाठी समर्पित व्हावा,असा परोपकाराचा सुंदर भाव आपल्या हृदयात उत्पन्न होतो तेव्हा खरं तर अवघी मानवता आम्हाला आपली वाटू लागते. असे उद्गार सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी 'मानव एकता दिवस' प्रसंगी भाविक भक्तगणांना संबोधित करताना व्यक्त केले.

मानव एकता दिवसाचे पावन पर्व बाबा गुरबचनसिंहजी यांनी मानवतेच्या प्रति केलेल्या महान सेवांसाठी समर्पित असून त्यातून प्रेरणा घेऊन निरंकारी जगतातील प्रत्येक भक्त आपल्या जीवनाचे कल्याण करत आहे. संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने आज संपूर्ण भारतवर्षात जवळपास २०७ठिकाणी विशाल रुपात रक्तदान शिबिरांच्या श्रृंखलेचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये सुमारे ५०००० युनिट रक्त संकलित करण्यात आले. त्यामध्ये संत निरंकारी सत्संग भवन गंगाधाम पुणे येथे आयोजित रक्तदान शिबिरात समस्त रक्तदात्यांनी स्वेच्छेने व अत्यंत उत्साहाने ७९४युनिट रक्तदान केले अशी माहिती पुणे झोन प्रभारी ताराचंद करमचंदानी यांनी दिली. ससून रुग्णालय रक्तपेढी २८९ व वाय. सी.एम.रुग्णालय रक्तपेढीच्या टीमने ५०५ युनिट रक्त संकलित केले. मानव एकता दिवस प्रसंगी आयोजित रक्तदान शिबिरात जनसमुदायाला संबोधित करताना सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या,की सेवा ही नेहमी निष्काम भावनेनेच केली जाते.अशी भावना जेव्हा आपल्या हृदयात निवास करते तेव्हा खऱ्या अर्थाने आपले जीवन मानवतेच्या कल्याणार्थ समर्पित होते. असेच परोपकारी जीवन बाबा गुरबचनसिंहजी यांच्या दिव्य शिकवणूकीचा आधार राहिला आहे. निष्काम सेवेच्या सुंदर भावनेविषयी बोलताना सद्गुरु माताजींनी समजावले,की जेव्हा आमच्या मनामध्ये निष्काम सेवेचा भाव उत्पन्न होऊ लागतो तेव्हा हे जग आणखी सुंदर दिसू लागते.कारण त्यावेळी आमची सेवाभावना साकार व कर्मरूप धारण करुन समस्त मानव परिवारासाठी वरदान बनून जाते. रक्तदान ही मनुष्य जीवन वाचविण्यासाठी केली जाणारी एक अशी सर्वोपरि सेवा आहे ज्यामध्ये परोपकाराची नि:स्वार्थ भावना निहित आहे.

## आ.रोहीत पवार यांनी घेतली दौंडच्या कार्यकर्त्यांची आणि वकील संघटनेच्या सदस्यांची भेट





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खा.सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ पारगांवमध्ये (ता.दौंड ) मविआ च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्ता मेळाव्याला उपस्थित राहून आमदार रोहीत पवार यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी दौंड तालुकाध्यक्ष आप्पासाहेब पवार, नामदेव ताकवणे, विठ्ठल खराडे, दिग्विजय जेधे, रामभाऊ टुले, अजित शितोळे,सचिन काळभोर, वंदनाताई मोहिते, सचिन रणदिवे यांच्यासह मविआ चे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या उपस्थित होते.

तसेच दौंड न्यायालयात देखील वकिल संघटनेचे पदाधिकारी म्हणजेच न्यायप्रक्रियेत वकिलांचं महत्त्व अत्यंत महत्त्वाचं आहे. याच वकिल बांधवांची संघटना असलेल्या 'दौंड बार असोसिएशन'च्या सदस्यांची भेट घेऊन त्यांच्यांशी संवाद साधला. यावेळी बारचे प्रमुख पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

## विदर्भात गारपीट तर मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात वादळी पावसाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात ढगाळ हवामानामुळे कमाल तापमानात चढ-उतार होत आहेत. हवामान विभागाने आज कोकणात उष्ण व दमट हवामानाचा, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात वादळी वारे, विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी गारपीटीची शक्यताही हवामान खात्याने वर्तवली आहे.मध्य महाराष्ट्र आणि परिसरावर चक्राकार वाऱ्याची स्थिती आहे. गेल्या काही दिवसांपासून मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात ढगाळ हवामान होत असून अनेक जिल्ह्यांत वादळी पावसाने तडाखा दिला. राज्यात आता पुढील चार ते पाच दिवस वादळी वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तर पुण्यातही पुढील तीन दिवस विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.आज जळगाव, नगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, वाशीम, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोलीमध्ये वादळी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर कोकणामध्ये उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी केला आहे.

## चारोळी

नभ दाटूनी येता
शब्द फुलूनी येतात
नभ बरसूनी जाता
शब्द सर बनूनी वाहतात.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## वाघोरा व लेंडी पिंपळगाव येथील शेतकऱ्यांची गाळ टाकण्यास लगबग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



गाळयुक्त शिवार अभियानंतर्गत, मौजे वाघोरा व लेंडी पिंपळगाव तलाव मधीन गाळ काढण्याच्या कामाला वेग आला असून जलसंधारण विभाग बुलढाणा व अशासकीय संस्था भगवान बाबा बहुउद्देशिय संस्था हनवतखेड ता. सिंदखेड राजा यांच्या माध्यमातून चालू झालेला आहे. या योजनेमुळे तलावातील जल साठ्यामध्ये पाण्याची साठवन क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असुन सोबतच शेती उपयोगी गाळ शेतकरी शेतामध्ये टाकत असल्यामुळे शेती सुपीक होणार आहे.

या मध्ये शेतकऱ्यांना वाहतुक खर्च करावा लागणार असून मशिन खर्च शासन करणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, जास्तीत जास्त शेतकरी गाळ शेतात टाकुयासाठी इच्छुक झाले आहेत.

## सुलतानपुर येथील तांडा वस्ती अंतर्गत होणारे

# सिमेंट रोड काम बोगस होत असल्या मुळे सुलतानपूर ग्रामस्थांनी केले बंद

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । प्रतिनिधी**

सुलतानपुर ता लोणार: तांडा वस्ती अंतर्गत सुरु करण्यात आलेले काम अंदाज पत्रकानुसार होत नसल्याने नागरिकांनी आज दि.२५/०४२०२४ रोजी काम बंद केले. त्यामुळे होणारे काम दर्जेदार करावे. अशी मागणी नागरिकाची आहे. सुलतानपुर येथे वसंतराव नाईक सुधार वसती योजने अंतर्गत वार्ड क. २ व ३मध्ये १५लाख रुपयाचे सिमेंट रोड मंजुर करण्यात आला आहे. परंतु या रोडचे काम अंदाज पत्रकानुसार होत नव्हते या कामावर मुरूम न टाकता. गिट्टी टाकली होती. वत्यावर रोलर न फिरवता. गिट्टी सिमेंटचा माल टाकल्या जात होता. मात्र हा प्रकार उपस्थित नागरिका च्या लक्षात येताच त्यांनी हा प्रकार पंचायत समिती अभियंता आर. डी. शिंदे यांना फोनवरून संपर्क करून त्याना सांगण्यात आले. त्यामुळे सदर काम बंद करण्यात आले. त्यामुळे तांडा वस्ती अंतर्गत होणारे सिमेंट रोड चे काम हे दर्जेदार व अंदाज पत्रकानुसार करावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



## महाविकास आघाडीचे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांच्या सुपुत्रांनी केली पोलिसांना शिवीगाळ करून मारहाण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा मतदार संघातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गट महाविकास आघाडीचे लोकसभेचे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील आष्टीकर यांनी पोलिसांना केली मारहाण व शिवीगाळ केली.रामकीसन नामदेवराव शिंदे वय ४९ वर्ष राहणार गोकुळ नगर उमरखेड यांना एस एस टी पैनगंगा नदी मारलेगाव नाका येथे कृष्णा नागेश पाटील व त्याचे सोबत असलेल्या लोकांनी शासकीय कामात अडथळा निर्माण करून हमला केला.

सहाय्यक विनोद मारोतराव काकडे, प्रकाश माधव पवार कृषी सहाय्यक, ग्रामपंचायत शिपाई अशोक बापूराव सूर्य, उपस्थित होते.तु माझीच गाडी कसा अडवतोस, तुला वर्दीचा जास्त माज आला का, तु मला ओळखत नाही का मी नागेश पाटील चा मुलगा कृष्णा नागेश पाटील आहे असे बोलु लागला त्यावर कर्मचाऱ्यांनी समजावुन सांगीतले की, आमची वाहने चेक करण्याची डयुटी आहे व ती आम्ही करीत आहे.एकामागे एक उभे असलेल्या आठ गाडयामधील अंदाजे २० ते २५ कार्यकर्ते एकदाच नाक्यावर गोळा झाले. त्यातील दोन ते तीन लोकांनी शिवीगाळ केली.कुष्णा नागेश पाटील याने कर्मचाऱ्यांच्या गळ्यातील आयकार्ड ओढुन धरले व शिवीगाळ केली व ढकलले तसेच सोबत असलेले कर्मचारी हे देखील त्या लोकास वाहन चेक करणेबाबत समजविण्यास गेले असता कुष्णा नागेश पाटील याने सर्वानां शिविगाळ केली.पो. शी टेंबरे यास बोलला की तुझे नाव काय आहे टेंबरे तुला सस्पेंड करतो, त्याची व्हीडीओ शुटिंग कॅमेरामन राजरत्न नवसागरे हे करीत असता त्याचा कॅमेरा हिसकावुन घेतला व फेकुन दिला व त्याला च्युतमारीच्या कॅमेरा बंद कर चल येथुन नीघ असे बोलला.पो.शी आडे हे डीव्हायडर येथे उभे होते व घडलेल्या घटनेची अधिकारी यांना सुचना देनेकरीता फोन काढला असता त्यांचा मोबाईल रीअलमी ५प्रो



वाहनातील सोबत असलेला बाउंसर याने हिसकावुन घेतला व कुष्णा पाटील याने गाडीत बसुन समोर १५ मीटर अंतरावर जावुन आडे यांचा फोन रागाने रोडवर आपटुन फोडुन टाकला त्यांचे १६,००० चे नुकसान केले. व त्यांचे कुठलेही वाहन चेक करु न देता सर्व कर्मचाऱ्यांना शिविगाळ करुण व जीवे मारण्याची धमकी दीली व शासकीय कामात अडथळा निमार्ण केला. त्याचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी अशी तक्रार कृष्णा पाटील आष्टीकर यांच्याविरुद्ध उमरखेड पोलीस स्टेशन मध्ये नोंदविली आहे.

कृष्णा पाटील अष्टीकर व सहकार्यावर कलम ३५३, २९४,४२७, ५०४,५०६,३४ भांदवी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला.

विशेष म्हणजे हा प्रकार सुरू असतानाच उमरखेड शहरात जिल्हा अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा बैठक घेत होते .

संपादकीय

# अशी चाले वीजगाडी...

प्रगत राष्ट्रांच्या पंक्तीत प्रवेश करायची भारताची तयारी जोरात चालू आहे. स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत भारत एक पूर्ण प्रगत राष्ट्र असेल, असा निर्धार सध्याच्या मोदी सरकारने केला आहे आणि त्यानुसार पावले उचलायलाही सुरुवात झाली आहे. यातील एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे विजेवर चालणारी वाहने. जागतिक स्तरावर चीन, जपान, फ्रान्स, कॅनडासारख्या मोजक्या राष्ट्रांनी अंगिकारलेल्या 'इव्ही३०३०' या मोहिमेत भारत सहभागी झाला आहे. या अंतर्गत सन २०३०पर्यंत भारतातील निदान ३० टक्के वाहनविक्री ही विद्युत वाहनांची असेल, असा निर्धार भारताने इतर समाविष्ट देशांप्रमाणे केला आहे. प्रदूषण, खनिज तेल समस्या व त्याचप्रमाणे जागतिक स्तरावर स्वीकृत करण्यात आलेल्या इतर शाश्वत विकास ध्येयांच्या पूर्ततेसाठी भारत सरकार पर्यायी इंधन, विद्युत परिवहन, विद्युत वाहननिर्मिती यावर भर देत आहे. त्या अर्थाने भारतातील विद्युत वाहनांचे (ईव्ही) क्षेत्र सध्या परिवर्तनाच्या एका मोठ्या टप्प्यावर आहे. शाश्वत विकासाच्या दिशेने होणाऱ्या जागतिक बदलामुळे, भारत ईव्ही क्रांतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी तयार झाला आहे आणि त्या बदलाच्या दिशेने पावले टाकत आहे.

ऑगस्ट २०२३पर्यंत भारतात सुमारे २८ लाख विद्युत वाहने रस्त्यांवर धावत होती. यातील बहुतांश दुचाकी व तीन चाकी आहेत. सन २०२३मधील एकंदर वाहन विक्रीतील विद्युत वाहन विक्रीचा हिस्सा ६.३८ टक्के होता. सन २०२२मध्ये ही टक्केवारी फक्त १.७५ होती. सन २०२३मध्ये सुमारे १५ लाख विद्युत वाहनांची विक्री झाली. आधीच्या वर्षाच्या तुलनेत ही ५० टक्के अधिक होती. यात दुचाकी व तीनचाकीचा हिस्सा ९०-९५ टक्के होता. सन २०२४चा विद्युत वाहन विक्रीचा अंदाज सुमारे २० लाखांचा आहे. यावरून विद्युत वाहनांना ग्राहकांची पसंती वाढत आहे, असेच दिसून येते.

भारताचे परिवहन व रस्ते मंत्री नितीन गडकरी यांनी दिलेल्या एका आकडेवारीनुसार सन २०१९ ते २०२१ या काळात दुचाकी विद्युत वाहनांची विक्री ४२२ टक्क्यांनी, तीनचाकी वाहनांची विक्री ७५ टक्क्यांनी, तर चारचाकी वाहनांची विक्री २३० टक्क्यांनी वाढली. विद्युत बस विक्री याच काळात १२०० टक्क्यांनी वाढली. अर्थातच सुरुवातीच्या काळातील खप फारच कमी असल्यामुळे ही वाढ मोठी वाटते. तरीही विद्युत वाहनांचा खप वाढला आहे आणि तो वाढत आहे, यात शंका नाही. भारताचे विद्युत वाहन निर्मिती आणि विक्री यांतील यश त्याच्या दुचाकी बाजारपेठेपुरते मर्यादित आहे, असे सध्या तरी म्हणता येईल. चारचाकी वाहनांसाठी उत्पादन व त्या पश्चात विक्री हे इतके सोपे राहणार नाही. त्यातील आव्हाने अनेक आहेत, हे नमूद करणे आवश्यक आहे.

विद्युत दुचाकीचे विक्री अर्थशास्त्र देशात सध्या आणि येणाऱ्या काळात देखील बाजारासाठी फायद्याचे असेल. त्याची अनेक कारणे आहेत. लहान पॉवरपॅक, कमी किंमत, वापरलेली बॅटरी व नवीन चार्ज केलेली बॅटरी यांच्या अदलाबदलीची सोय, चार्जिंग सुविधेची वाढत्या प्रमाणात उपलब्धता आदींचा त्यात समावेश आहे. सरकारकडून दिले जाणारे अतिरिक्त प्रोत्साहन, सवलती हे घटक देखील विद्युत वाहनांच्या किंमती कमी करण्यास आणि त्यांचा खप वाढवण्यास मदत करीत आहेत.भविष्याकडे पाहता, भारतातील विद्युत वाहनांची बाजारपेठ झपाट्याने वाढेल, अशी अपेक्षा आहे. सन २०३०पर्यंत भारताच्या वाहन बाजारात विद्युत वाहनांचा वाटा ४० टक्क्यांपेक्षा अधिक असू शकतो आणि ही बाजारपेठ सुमारे १०० अब्ज रुपयांपेक्षा अधिक महसूल मिळवू शकते, असा एक अंदाज आहे.

भारत सरकार विविध योजना आणि प्रोत्साहनांद्वारे विद्युत वाहनांच्या खरेदीस चालना देत आहे. विद्युत वाहनांचा वेगवान अवलंब आणि उत्पादन (ऋ-चए - फास्टर ॲडॉप्शन ऑफ मॅन्युफॅक्चरिंग ऑफ इलेक्ट्रिक व्हेईकल) योजना हा असाच एक उपक्रम आहे. या उपक्रमाची सुधारित विस्तारित आवृत्ती-२ सरकारने अंमलात आणली आहे. या योजनेत केलेले काही बदल हे तितकेसे फायदेशीर नाहीत, असे काही उत्पादकांचे मत असले तरी 'फेम' योजनेचा फायदा होत आहे, हे नक्की. विद्युत वाहन उद्योगातून सन २०३२पर्यंत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा सुमारे ५० दशलक्ष रोजगारांची निर्मिती होईल, असा अंदाज आहे. रोजगार निर्मिती हा विषय भारतीय अर्थव्यवस्थेच्या व सरकारच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे; आणि त्या दृष्टीने देखील या उद्योगाच्या वाढीसाठी केंद्र सरकार प्रोत्साहन देत आहे. सन २०२२ ते २०३०दरम्यान बाजारपेठेत विद्युत वाहनांच्या उत्पादनात ४९ टक्के चक्रवाढ वार्षिक वाढदर (उ-ऋठ) दिसण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे. या काळाच्या अखेरीस विद्युत वाहनांची वार्षिक विक्री सुमारे १० दशलक्षपर्यंत पोहोचेल, असाही अंदाज आहे. एकंदर पाहता या उद्योगाच्या बाबतीत खूपच आशादायी, उत्साही वातावरण दिसते आहे. ही महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, सरकार आणि खासगी क्षेत्र यांनी एकमेकांच्या साह्याने प्रयत्न करायला हवेत. नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन (छएचचझ) आणि राज्य-स्तरीय प्रोत्साहन यांसारखी धोरणे या उद्योगाला चालना देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील, अशी आशा आहे.'नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन २०२०'अंतर्गत विद्युत आणि हायब्रीड वाहने उत्पादन, विक्री आणि उपयोग, भारतात वाढवण्याचे व या वाहनांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अंमलात आणण्यात आले आहे. या वाहनांची संख्या सन २०२०पर्यंत ६०-७० लाखापर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय सरकारने स्वीकारले होते आणि त्याची पूर्तता झाल्याचे दिसत आहे. सरकारची 'फेम', 'नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन' इत्यादी धोरणे या उद्योगाला योग्य दिशा देत आहेत, असे दिसून येते आहे.चारचाकी विद्युत वाहनांना पसंती मिळत असल्याचे दिसत असले तरी बरेच ग्राहक आपल्या अनेक चारचाकीपैकी एक म्हणून विद्युत चारचाकीस पसंती देत आहेत. त्यांच्या मागणीचा वेग अजूनही म्हणावा तितका नाही. सुरुवातीची खरेदी किंमत ही अद्यापि बऱ्याच ग्राहकांच्या दृष्टीने अधिक आहे. विद्युत चारचाकीचा महत्त्वाचा भाग म्हणजे बॅटरी. या बॅटरीचे आयुष्य हे साधारण ७-८ वर्षे असते. त्यानंतर घ्याव्या लागणाऱ्या नव्या बॅटरीची किंमत ही पाच-साडेपाच लाखांच्या घरात जाते. विद्युत वाहन परिसंस्थेचा (इकोसिस्टम) एक महत्त्वाचा घटक म्हणजे चार्जिंग पायाभूत सुविधा. भारतात विद्युत वाहन क्षेत्राला गती मिळण्यासाठी सरकारने चार्जिंगच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे देशात केल्या गेलेल्या एका सर्वेक्षणात ५१.७० टक्के प्रतिसादकर्त्यांनी नमूद केले. महानगरे आणि शहरी केंद्रांमध्ये चार्जिंग स्टेशनच्या जाळ्यात, विस्तारात लक्षणीय प्रगती झाली असली तरी, ग्रामीण भागात आणि लहान शहरांमध्ये मात्र या सुविधा उपलब्ध असण्याचे आव्हान कायम आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी सरकार, खासगी कंपन्यांसह, चार्जिंग पायाभूत सुविधांच्या विकासासाठी गुंतवणूक करत आहे. 'नॅशनल इलेक्ट्रिक मोबिलिटी मिशन प्लॅन' (छएचचझ) सारख्या उपक्रमांचा उद्देश लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी महामार्गांवर आणि महत्त्वाच्या ठिकाणी चार्जिंग स्टेशन निर्मिती करणे हा आहे; मात्र, त्यात लक्षणीय प्रगती गरजेची आहे. विद्युत वाहनांची शक्ती, बॅटरी व त्याचे तंत्रज्ञान यावर संशोधन व एकंदरच या क्षेत्रात नवनिर्माणाचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होत आहे. या वाहनांची किंमत कमी करण्याचे प्रयत्नही चालू आहेत. भारतातील विद्युत वाहनांची संभाव्य मागणी, त्या मोठ्या बाजारपेठेची क्रयशक्ती हे बघून आंतरराष्ट्रीय वाहन उद्योग भारताकडे आकर्षित न झाला तरच नवल. काहीच महिन्यापूर्वी चीनमधील प्रसिद्ध 'बी.वाय.डी.' (बिल्ड युअर ड्रीम्स) आणि भारतीय उद्योग 'मेघना इंजिनिअरींग अँड इन्फ्रास्ट्रक्चर' या कंपनीची १०० कोटी अमेरिकन डॉलर गुंतवणुकीची तेलंगणमधील योजना केंद्र सरकारने सुरक्षेच्या कारणावरून नामंजूर केली. 'बी.वाय.डी.' ही जगातील प्रथम क्रमांकाची विद्युत वाहन उत्पादक कंपनी आहे. दरवर्षी सुमारे १० हजार ते १५ हजार विद्युत चारचाकी बनवण्याची त्यांची योजना होती. स्वयंचलित, विद्युत वाहनांचे उत्पादन करणाऱ्या अमेरिकेतील 'टेस्ला' या कंपनीचे प्रतिस्पर्धी होण्याचे त्यांचे स्वप्न होते.'टेस्ला'ही बरेच वर्षापासून भारतात प्रवेश करण्यास उत्सुक आहे. टेस्लाची अनेक वाहने आज भारतातील रस्त्यांवर दिसत आहेत. वाहनांच्या सुट्या भागांची निर्मिती करणाऱ्या भारतातील आठ कंपन्यांकडून टेस्ला साधारण १०० ते २०० कोटी अमेरिकी डॉलरचे सुटे भाग खरेदी करत आहे. एकूणच विद्युत वाहननिर्मितीच्या विषयावर 'टेस्ला'चे मुख्य प्रवर्तक एलन मस्क आणि 'रिलायन्स उद्योग समूहा'चे अध्यक्ष मुकेश अंबानी यांची बोलणी चालू असल्याचे कानावर येत आहे. रिलायन्स आणि टेस्ला हे भारतात विद्युत वाहन उत्पादनासाठी एक सामूहिक प्रकल्प स्थापतील, अशी बातमी आहे. त्याचप्रमाणे, 'व्हिन फास्ट' ही व्हिएतनामची कंपनी, 'किया', 'स्कोडा', 'बीएमडब्ल्यू', 'मर्सिडीज' यांचाही विद्युत चारचाकी वाहन उत्पादन प्रकल्प भारतात सुरू करण्याचा उद्देश आहे. भारतातील 'टाटा', 'महिंद्र', 'मारुती','अशोक लेलँड' यांची विद्युत वाहने उपलब्ध आहेत आणि होत आहेत. 'टाटा'ने तर यात अग्रक्रम मिळवलेला आहे. दुचाकी क्षेत्रात भारत आघाडीवर आहे. 'होंडा' आपला विद्युत दुचाकी प्रकल्प चालू करत आहे; त्याचबरोबर यात 'मेटा फोर', 'फॅक्सकॉन'सारख्या विदेशी कंपन्या देखील भारतात येण्याचा विचार करीत आहेत.विद्युत वाहन उद्योग एका मोठ्या स्थित्यंतरावर येऊन पोहोचला आहे. यात आघाडी घेऊन भारत या क्षेत्राचे नेतृत्व करेल, असे सध्यातरी दिसत आहे. हे भारताला साध्य करता आल्यास त्याचा फार मोठा प्रभाव भारतीय अर्थव्यवस्थेवर पडेल आणि त्यायोगे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक क्रमवारीत उच्चस्थान मिळवेल, यात शंका नाही.

(लेखक उद्योग,उद्योजकता, व्यवस्थापन, मार्गदर्शक आहेत.)


# वाचनाच्या बदलत्या प्रेरणा

ज्ञान आणि संस्कृतीची केंद्रे आज खूप विस्तारली आहेत. ग्रंथ या संकल्पनेचं स्वरूप जसे बदलत आहे, तसेच ग्रंथ वाचणाऱ्यांची आवडही बदलत आहे. आजच्या जागतिक ग्रंथ दिनानिमित्त समकालीन साहित्य व्यववहाराचा घेतलेला वेध
जगज्जेता सिकंदराच्या संदर्भातील एक कथा प्रसिद्ध आहे. त्याचे सैनिक एक शहर जिंकायला गेले आणि ते जिंकून त्याच्यापाशी आले आणि आनंदाने विजयासंबंधी बोलू लागले. 'आम्ही शत्रूची सर्व केंद्रे उद्ध्वस्त केली, फक्त त्यांचे ग्रंथालय तेवढे राहिले. त्यावर सिकंदर चिडला; तो म्हणाला, 'मुर्खांनो, ग्रंथालय हे ज्ञानाचं आणि संस्कृतीच्या विकासाचं केंद्र. तेच तुम्ही सोडलंत.' संस्कृतीच्या इतिहासात पुस्तकांचं इतकं महत्त्व होतं, आणि आहे सुद्धा. आज ज्ञान आणि संस्कृतीची केंद्रे खूप विस्तारली आहेत आणि ग्रंथ या संकल्पनेचं स्वरूपही बदलत आहे, मात्र वाचन ही यातली मूळ प्रेरणा आहे. आजच्या जागतिक ग्रंथदिनी ते समजून घेणं आवश्यक आहे.प्राचीन मराठी साहित्याच्या इतिहासात ग्रंथ आणि शिक्षणाला असाधारण महत्त्व होते. समाज आलुतेदार-बलुतेदारांमध्ये विखुरलेला होता, तरीही जिजाबाईंनी संभाजी महाराजांच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. पेशवाईच्या काळात नकलविसांकडून पोथ्यांच्या कॉप्या करून घेतल्या जात. इंग्रजी काळात शिक्षणप्रसाराबरोबर ग्रंथमहात्म्य लोकांना पटू लागले आणि छपाईची साधने वाढली. नंतर वृत्तपत्रे आणि ग्रंथप्रकाशन वाढले. त्या काळात चार आणे माला यांसारख्या माला वाढल्या आणि तत्कालीन वाचकांची भूक त्या भागवत राहिल्या. आता पुस्तकांच्या डिजिटल आवृत्त्या बाहेर पडू लागल्या आहेत. लॅपटॉप, किंडल, ईबुक्स या नवीन माध्यमांनी प्रत्यक्ष छपाईची जागा घेतली. ग्रंथवाचनापेक्षा ग्रंथश्रवणाला महत्त्व आले. अमेरिकेत मोटारच्या प्रवासात ऑडिओ बुक ऐकण्याचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. वाचनप्रक्रियेचे स्वरूप आता बदलू लागले आहे.साधारण ३० वर्षांपूर्वी आलुरकरांनी याचे महत्त्व ओळखले आणि पु. ल. देशपांडे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, व. पु. काळे यांच्या पुस्तकांच्या ऑडिओ कॅसेट्स प्रकाशित केल्या. मराठी वाचकांनी प्रकाशन व्यवसायातले हे स्थित्यंतर स्वीकारले. आता पुस्तकांच्या ई आवृत्त्याही निघू लागल्या. परंतु, या सर्व आधुनिक अवताराकडे येतानाही मुळात वाचनाची आवड आणि प्रवृत्ती जपणे, ती आकाराला येणे, अभिरुची निर्माण होणे हे महत्त्वाचे आहे.संत तुकारामांच्या अभंगातील 'काही पाठ केली संतांची उत्तरे' आणि 'गाती पुढे त्यांचे धरुनि ध्रुपद' हे चरण महत्त्वाचे आहेत. ग्रंथ अवलोकणं, वाचन करणं महत्त्वाचं आहे. आपल्या संस्कृतीमध्ये 'बहुश्रुत' हा शब्द आहे, कारण एकेकाळी बरचंसं ज्ञान ऐकण्यातून येत असे. पुढे त्याचे 'ुशश्रश्र ीशरव' झाले, मात्र आजच्या काळात पुन्हा एकदा 'बहुश्रुत'ला अर्थ प्राप्त झाला आहे. चित्त एकाग्र करून, पुस्तकात डोकं खुपसून एकांतात काहीतरी कल्पित वा वैचारिक वा अनुभवाधिष्ठित वाचन करणं आणि नाटक-सिनेमा-वेबमालिका यातलं काही संवेदनशील पाहणं, ही सुद्धा आजच्या काळात ज्ञानाचं आणि संस्कृतीच्या विकासाची केंद्रं झाली आहेत. आज आपल्याला असंख्य माध्यमं उपलब्ध आहेत, पुस्तकवाचन हे त्यापैकी एक झाले आहे. या माध्यमांचा डोळस वापर होतो का, हा प्रश्न आहे.तरुणांना वाचनाची सवय राहिलेली नाही, असा नकारात्मक सूर काढला जातो. व्यापक अर्थाने तो खरा असेलही. परंतु, त्याला अपवादही अनेक आहेत. 'आजची मुलं काय वाचतात' हे पाहण्यासाठी झालेल्या सर्वेक्षणात मी सहभागी होतो. ही मुलं वाचनाची आवड असलेल्या मध्यमवर्गातील आहेत. मुलांना पुस्तकांची, लेखकांची नावं आठवत होती. पुस्तकांच्या स्वरूपाविषयी, आशयाविषयी सांगण्याविषयी ती प्रयत्न करीत होती. इंग्रजी पुस्तकांच्या अनुभवांविषयी त्यांना माहिती होती. त्यापैकी काही त्यांनी पाहिलेली होती, पण त्याविषयी ती फारशी समाधानी नव्हती, असेही दिसले.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी बोलताना चेतन भगत, शोभा डे, डेल कार्निजी, रवी बापट, सुधा मूर्ती, रवीन थत्ते, वसंत वसंत लिमये, सुदीप नगरकर, मंगला गोडबोले, ह. मो. मराठे, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, उमा कुलकर्णी, अच्युत गोडबोले, पुल, वपु, शिवाजी सावंत, गोनीदां यांची नावं आली. मराठी विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नेमाडे, भाऊ पाध्ये, कुसुमाग्रज, तेंडुलकर, पाडगावकर यांचं लेखन वाचलेलं होतं. आपले तरुण नाट्य-चित्रपट कलावंत काय वाचतात याची आपल्याला कल्पना असते. एखादी स्पृहा जोशी प्रणव सखदेव यांची 'काळे करडे स्ट्रोक्स' वाचून आत्मीयतेने लिहिते, हे समाधानकाराक आहे. समकालीन मराठी लेखक प्रणव सखदेव, हृषिकेश गुप्ते, कृष्णात खोत यांचे लेखन वाचले जाते. तरुण वाचक स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक ती पुस्तकं, वेब सेरीज आणि ईबुक्सचाही वापर करतात.आपल्या ग्रंथसंग्रहालयात ग्रंथालयसेवक म्हणून काम करणारे तरुण-तरुणी अनेकदा 'एसएससी' होऊन तीन महिन्यांचा सर्टिफिकेट कोर्स करून आलेले असतात. कॉलेज आणि विद्यापीठातल्या ग्रंथालयांमध्ये काम करणारे ग्रंथालयशास्त्रात पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले असतात, पण यातील अनेकांना त्यासंबंधी फारसे ज्ञान नसते, ही गंभीर बाब आहे. अभ्यासकांना मनःपूत सहाय्य करणाऱ्या व्यक्तींची मोठी संख्या ग्रंथालयांत एकेकाळी राज्यभर होती, त्यांची संख्या आता फार कमीच असणार, याची खूणगाठ बांधून घेतली पाहिजे.महाराष्ट्रात साहित्यिक वर्तुळे विखुरलेल्या अवस्थेत का होईना, अजून आहेत, तशीच जगभरातही आहेत. मी अमेरिकेत गेलो असताना 'या शनिवारी आमचा एक गट भेटणार आहे. काही वाङ्मयीन चर्चा आम्ही करतो. तुम्ही याल का?' असे विचारल्यावर मी रुकार दिला. त्यांच्यापैकी काही सॉफ्टवेअरमधील, कुणी आर्किटेक्ट, कुणी वैज्ञानिक, कुणी अभियंता असल्याचे कळले. दोघांनी आपल्या कथांचे वाचन केले, एकाने 'महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीं'वर निबंध वाचला. एकाने 'शेतीविषयक प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या' यावर लेखन केले होते. तर एका तरुणीने 'मंगेश पाडगावकरांची कविता' यावर आपले टिपण सादर केले. वाचन झाल्यावर इतर प्रतिक्रिया देत होते. इतर मंडळींच्या प्रतिक्रिया संबंधित लेखक गंभीरपणे आपल्या वहीत नोंदवून घेत होता. एका अर्थाने तो एक त्यांच्या पातळीवरील श्रळींशीरी वळीर्लीीश होता. या विषयी मी विचारणा केली. तेव्हा, 'या टिपणांच्या आधारे आम्ही पुढे हे लेखन यथावकाश दुरुस्त करतो,' असे एकजण म्हणाला. 'मग ते कुठे प्रसिद्धीसाठी पाठवता का?' या प्रश्नाला त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक होते. 'हा आमचा लेखनाचा रियाज समजा ना. ते प्रसिद्ध झाले तर हवेच असते. इथल्या महाराष्ट्र मंडळाच्या पत्रिकेला आम्ही क्वचित पाठवतो, पण खरं सांगू का, त्याहीपेक्षा वेळात वेळ काढून ठरवलेल्या विषयावर संदर्भ पाहणे, चिंतन करणे, मनातल्या मनात लेखनाची आखणी करणे आणि प्रत्यक्ष ते कागदावर उतरवतानाचा रोमांच अनुभवणे, आम्हांला महत्त्वाचे वाटते. शिवाय प्रत्यक्ष चर्चेत विषयाचे विविध कंगोरे स्पष्ट होतात, ते वेगळेच.'आत्मचरित्रे, चरित्रे, माहितीपर, करुणकप्रधान पुस्तकांना अधिक वाचक आहे. नाटक, कविता, कादंबऱ्या याकडे कल कमी झाला आहे. विज्ञानविषयक लेखन, समीक्षा, संशोधन याचं भान मात्र तरुणांना असल्याचे दिसत नाही. आपल्या तरुणांची ही उदासीनता मन हतबल करणारी आहे. म्हणून मी माझ्या मूळच्या निरीक्षणाकडे आपले लक्ष पुन्हा वेधतो : एकूणच माणसाला जे जे दृक्-श्राव्य, ते ते अधिकतर प्रिय होत आहे, केवळ वाचन तितकेसे भावत नसावे. यापुढे प्रसारमाध्यमं, किंडल, वेबमालिका, यांचा जमाना असणार आहे. तेव्हा त्या हाका सावधपणे ऐकून त्यांचाही वेध घ्यावा हे उत्तम!



# तप्त पृथ्वीच्या झळा

गेल्या वर्षातील जगभरातील उष्णतेच्या लाटांचा अभ्यास करून शास्त्रज्ञांनी पृथ्वीचा 'ताप' वाढत असल्याचा निष्कर्ष काढला आहे.
दक्षिण आणि नैर्ऋत्य युरोप, उत्तर अमेरिका, उत्तर आफ्रिका, दक्षिण आफ्रिका, आशिया... खंडात्मक प्रदेशांचा हा उल्लेख एवढ्यासाठीच की गेल्या वर्षी म्हणजे २०२३मध्ये त्यांतील कोणत्या ना कोणत्या मोठ्या भागात उष्णतेची लाट आली होती. एकाच वेळेला इतक्या मोठ्या प्रदेशांत उष्म्याची लाट येणे हे पृथ्वी अधिक उष्ण होत असल्याचे लक्षण आहे. गेल्या वर्षातील जगभरातील उष्णतेच्या लाटांचा अभ्यास करून शास्त्रज्ञांनी पृथ्वीचा 'ताप' वाढत असल्याचा निष्कर्ष काढला आहे. वास्तविक, गेल्या काही वर्षांपासून उन्हाळा तीव्र होत असल्याचा अनुभव येत असल्याने हा निष्कर्ष अगदीच नवा नाही; परंतु हवामानातील बदलांबाबत ते देत असलेल्या इशाऱ्यांपासून बोध घेणे हे जगभरातील धोरणकर्त्यांचे कर्तव्य आहे.प्रदूषणामुळे कार्बन डाय ऑक्साइडसहित अनेक वायूंचे उत्सर्जन वाढत असून, त्याचा परिणाम पृथ्वी तापण्यावर होत असल्याचे वैज्ञानिक गेली तीन दशके सांगत आहेत. जीवाश्म इंधनावरील अवलंबन कमी करण्याच्या आणि पर्यावरणपूरक विकासाचे नवीन प्रतिमान विकसित करण्याच्या आणाभाका आंतरराष्ट्रीय पातळीवर घ्यायला सुरुवात होऊनही अडीच दशके लोटली आहेत. मात्र, बहुतेक देश भौतिक विकासाच्या पारंपरिक संकल्पनांनाच कुरवाळत बसले आहेत. आजवरच्या प्रदूषणाला सर्वाधिक कारणीभूत असलेल्या अमेरिकादी देशांची दुटप्पी नीतीही त्याला तितकीच कारणीभूत आहे. त्यामुळे हवामान बदलाच्या जागतिक परिषदांतून पर्यावरणावर चर्चा होत असली, तरी प्रत्यक्षात घडते ते राजकारणच. उत्सर्जन कमी करण्याचे आणि तापमानवाढ रोखण्याचे उद्दिष्ट कागदावरच राहते. उष्णतेच्या लाटांत होणारी वाढ आणि एकूणच अवर्षण, अतिवृष्टी, चक्रीवादळे आदी नैसर्गिक आपत्तींत होणारी वाढ ही या राजकारणाची फलश्रुती म्हणता येईल. या राजकारणावर मात करणारे धोरण प्रत्येक देशांना अवलंबण्याची गरज आहे. त्या दिशेने संथगतीने का होईना भारताची वाटचाल होत आहे.विकसनशील देश असूनही आणि पारंपरिक ऊर्जास्रोतांवरील अवलंबित्व मोठे असूनही भारताने उत्सर्जन घटविण्याबाबत कटिबद्धता दर्शविली आहे, ही चांगली बाब. मात्र, केवळ कटिबद्धता दाखवून चालणार नाही, तर कृतीही आवश्यक आहे. कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्यासाठी भारताने दूरवरचे लक्ष्य ठेवले असले, तरी त्यासाठी आतापासूनच प्रयत्नशील असायला हवे. देशातील आघाडीच्या शंभरापैकी निम्म्याहून अधिक कंपन्यांनी आपल्या कार्बन उत्सर्जनाची माहिती देण्याचा घेतलेला निर्णय हा त्याचाच एक भाग म्हणता येईल. अशा कृतिशील प्रयत्नांची संख्या वाढणे हीच आजची मुख्य गरज आहे



# महागाईचा चटका कोणाला?

गेल्या अनेक दिवसांपासून देशातील वाढत्या महागाईसंबंधीच्या बातम्या सातत्याने येत आहेत. 'महागाईमुळे घराचे बजेट कोलमडले', 'सामान्य माणसाचे कंबरडे मोडले' अशा प्रकारच्या बातम्यासुद्धा अनेकवेळा येतात. या संदर्भामध्ये अन्नधान्यांच्या वाढत्या महागाईमुळे सरकार, रिझर्व्ह बँक आणि सर्वसाधारण जनता असे सर्वजण चिंताग्रस्त आहेत. महागाई कमी झाली पाहिजे, यासंबंधी सर्वांचे एकमत आहे. अद्यापही महागाई पुरेशी आटोक्यात आलेली नाही, ही चिंताजनक बाब आहे. तथापि, वाढत्या महागाईचे विश्लेषण करून त्यावर उपाय सुचविणे हा या लेखाचा हेतू नाही; तर वाढत्या महागाईचा चटका कोणाला आणि कितपत बसत असेल याचा अभ्यास करणे, हा या लेखाचा मुख्य हेतू आहे. कारण वाढत्या महागाईचे चटके बसले की त्यामुळे असंतोष वाढतो. परंतु महागाई वाढूनसुद्धा जर इतर काही कारणांनी चटके बसले नाहीत तर असंतोष विशेष होत नाही. त्यामुळे बसत असलेल्या/नसलेल्या चटक्याचा अभ्यास करणे हेही महत्त्वाचे आहे. असो.आपल्या देशात महागाई मोजण्याचे साधन म्हणजे महागाईचा निर्देशांक होय. उदाहरणार्थ मार्च २०२३ ते मार्च २०२४ या काळात महागाई वाढली की कमी झाली हे बघावयाचे असल्यास सर्व वस्तूंची एकत्रित सरासरी किंमत २०२३ मार्चमध्ये १०० आहे असे मानले जाते. मार्च २०२४मध्ये त्याच वस्तूंची एकत्रित सरासरी किंमत जर १०८ असेल तर महागाई ८ टक्क्यांनी वाढली असे मानले जाते. सन २०२५मध्ये हीच किंमत जर ११० झाली तर महागाई ढोबळमानाने २ टक्के वाढली असे मानतात. (११० गुणिले १००/१०८ = १०१.८. म्हणजे साधारण २ टक्के) म्हणजे महागाईचा वेग ८ टक्क्यांवरून २ टक्के इतका कमी झाला, असे होते. याप्रमाणे प्रत्येक वर्षीची महागाई मोजली जाते.वस्तूंच्या ठोक किंमतीतील चढउतार मोजणाऱ्या निर्देशांकास ठोक निर्देशांक, तर किरकोळ किंमतीतील चढउतार मोजणाऱ्या निर्देशांकास किरकोळ निर्देशांक म्हटले जाते. सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने किरकोळ निर्देशांक (म्हणजे किरकोळ महागाई) अधिक महत्त्वाची असते; कारण सामान्य माणसास आपल्या गरजेच्या वस्तू घेण्यासाठी किरकोळ किंमत द्यावी लागते. किरकोळ किंमत ठोक किंमतीपेक्षा जास्त असते. याचा बरा-वाईट परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर तात्काळ होत असतो. किरकोळ किंमती भडकल्या तर मोठ्या प्रमाणात जनतेमध्ये असंतोष होऊ शकतो. यामुळे किरकोळ महागाई शक्यतोवर आटोक्यात ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न असतो.सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने अन्नधान्याची किरकोळ महागाई सर्वांत महत्त्वाची होय. भारतासारख्या देशामध्ये सामान्य व गरीब लोकांचा त्यांच्या प्राप्तीमधील फार मोठा खर्च अन्नधान्यावर केला जातो. अन्नधान्ये जर महाग झाली तर गरीब जनतेचे आर्थिक जीवनमान तात्काळ खालावते. त्यामुळे अन्नधान्यांची महागाई कमी ठेवणे, हे प्रत्येक सरकारचे प्रथम कर्तव्य असते. वेळप्रसंगी इतर उपाय योजून सरकारने गोरगरिबांसाठी अन्नधान्ये स्वस्त ठेवणे आवश्यक असते. श्रीमंत देशामध्ये लोकांच्या प्राप्तीपैकी लहानसा भाग अन्नधान्यावर खर्च केला जातो. त्यामुळे अन्नधान्ये महाग झाली तरी श्रीमंत देशातील जनतेला आणि गरीब देशातील श्रीमंत लोकांना फारसा फरक पडत नाही, हे विसरू नये. यानंतर महागाईमुळे बसू शकणाऱ्या चटक्याचा अभ्यास करू...महागाई वाढली, सामान्य माणसाचे कठीण आहे, अशी सर्वजण तक्रार करीत असतात. तथापि महागाई वाढल्यामुळे आपल्याला आवश्यक असलेली किंवा हवी असलेली वस्तू विकत घेता येतच नाही, परवडत नसल्याने सोडून द्यावी लागते तेव्हा महागाईचा चटका बसला असे म्हणण्यास हरकत नाही. मात्र हे सर्व तारतम्याने घ्यावे. कारण एखाद्या मध्यमवर्गीय कुटुंबाला सेलिब्रिटी घेतात तसला फ्लॅट परवडणार नाही. याला 'चटका' म्हणणे हास्यास्पद होईल. तेव्हा चटक्याचा विचार जीवनावश्यक वस्तूंच्या संदर्भात करावा.महागाई वाढली तर त्याचा परिणाम/चटका कमी/जास्त करणारे अनेक घटक आहेत. सविस्तर पाहू : १) महागाई वाढली तरी आपली प्राप्ती/क्रयशक्ती जर महागाईपेक्षा जास्त वाढत असेल तर चटका जाणवत नाही/ कमी जाणवतो. २) जीवनावश्यक वस्तू, सेवा इ. गोष्टी जर सरकारकडून किंवा कंपनीकडून विनामूल्य किंवा अगदी नाममात्र किंमतीमध्ये मिळत असतील तर चटका बसत नाही. उदा. निवासस्थान, नोकर-चाकर, वाहन, टेलिफोन, अनुदानित भोजन, उपाहारगृह इ. ३) ज्या वस्तूवर आपण एकूण खर्चापैकी फार थोडा भाग खर्च करतो त्याची भाववाढ झाली तरी चटका बसत नाही. उदाहरणार्थ सामान्य माणूस आणि सोन्याची किंमत! या सर्व घटकामध्ये दरमहाची होणारी प्राप्ती (वेतन, व्याज, फायदा इ.) हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. प्राप्ती महागाईपेक्षाही जास्त वाढत असेल तर महागाई जाणवणार नाही हे आलेच! असो.वर केलेले सैद्धांतिक विवेचन महत्त्वाचे आहेच, पण प्रत्यक्ष परिस्थिती पाहणे अधिक महत्त्वाचे! आपल्या देशात गेल्या दहा वर्षांतील भाववाढ आणि पाच वर्षांतील भाववाढीची आकडेवारी उपलब्ध आहे. त्यानुसार, सन २०१९ ते २०२४ या दरम्यान एकूण भाववाढ ३२ टक्के झाली. दरवर्षी ६.४ टक्के. तर २०१४ ते २०२४ या काळात ६४ टक्के भाववाढ झाली. दरवर्षी पुन्हा ६.४ टक्के! यानंतर कळीचा प्रश्न! मग आपली (सामान्य माणसाची) आर्थिक परिस्थिती सुधारली की खालावली? याचा विचार प्रत्येकाने आपापला वेगळा करणे आवश्यक आहे. थोडक्यात १) गेल्या पाच वर्षांत आपली एकूण प्राप्ती ३२ टक्क्यांपेक्षा जास्त (आणि दहा वर्षांत ६४ टक्क्यांपेक्षा जास्त) वाढली असेल तर आपली परिस्थिती सुधारली असे मान्य करण्यास हरकत नाही. 'महागाई हरली आणि आपण जिंकलो' असे म्हणणे चूक नाही. मात्र ज्यांची प्राप्ती वाढली नाही, ज्यांना काहीही मोफत/नाममात्र किंमतीत मिळत नाही अशांची परिस्थिती खालावली हेही मान्य करावे. येथे महागाई जिंकली! मात्र हा दुबळा वर्ग हळूहळू का होईना पण कमी कमी होत आहे (गरिबी घटत आहे), ही समाधानाची बाब आहे.विकासाच्या प्रक्रियेबरोबरच देशात एकूण खर्च वाढल्यामुळे (मागणी वाढल्यामुळे) भाववाढ/महागाई वाढणे अटळ आहे. परंतु त्याचबरोबर लोकांची प्राप्तीसुद्धा वाढते. त्यामुळे महागाई झाली तरी सुसह्य होते. तेव्हा विकासाचा वेग वाढवून लोकांची प्राप्ती वाढविण्यास सरकारने प्राधान्य द्यावे. असे सुचविल्यास चुकीचे होणार नाही.

# खडसेंनी नाईलाजाने निर्णय घेतला असावा त्यांच्यावर तपास यंत्रणांचा दबाव होता-शरद पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

जळगाव (वृत्तसंस्था)

खडसेंनी नाईलाजाने निर्णय घेतला असावा. त्यांच्यावर तपास यंत्रणांचादबाव होता असे मोठे विधान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. आज जळगाव जिल्ह्यातील रावेर लोकसभा मतदारसंघात शरद पवार गटाचा कार्यकर्ता संवाद मेळावा पार पडला. यावेळी ते बोलत होते. त्यांनी यावेळी मोदींची हुकूमशाही राजवट उद्धस्त झाल्याशिवाय राहणार नाही असा हल्लबोलही केला आहे.यावेळी शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ''आज देशाचे चित्र बदललेले आहे. जो देश धान्य आयात करत होता. आता तोच देश निर्यात करत आहे. आज मोदी यांचे राज्य आहे. बळीराजाला मदत होईल असे काही सरकारकडून केले जात नाही. जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका केली जात आहे. ज्यांनी देशासाठी खस्ता खायल्या आहेत त्यांच्यावर टीका करणे हे काय पंतप्रधानांचे काम आहे का? आपण देशाचे पंतप्रधान आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. ते भाजपचे पंतप्रधान असल्यासारखे वागत आहेत'' असे शरद पवार म्हणाले.पुढे पवार म्हणाले, ''आज दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र शासकीय यंत्रणेचा उपयोग हुकूमशाहीसारखा केला जात आहे. मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकले जात आहे याचा अर्थ ही हुकूमशाही आहे. एखाद्याला वैयक्तिक त्रास देण्याचं काम सुरू आहे. यापूर्वी असं कधी होत नव्हतं. त्यामुळे अनेकांना यातना सहन कराव्या लागत आहेत. याचाच प्रभाव खडसेंवर झाला असावा. त्यांच्यावरही तपास यंत्रणांचा दबाव होता. त्यामुळेच त्यांनी नाईलाजाने असा निर्णय घेतला असावा'', असे शरद पवार म्हणाले.

याशिवाय, ''बाबासाहेबांनी शेवटच्या माणसासाठी काम करण्याचा प्रयत्न केला होता. आता लोकांना मोदी नको आहेत. हुकूमशाही नको, लोकशाही पाहिजे आहे. मोदींची हुकूमशाही राजवट उद्धस्त झाल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका यावेळी शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केली आहे.



# पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे आवाहन; बीडमध्ये स्वराज्य नगर परिसरात कॉर्नर बैठक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । प्रतिनिधी

दि.२० : महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून जिल्ह्यासह बीड मतदारसंघात केंद्र सरकारच्या योजना आणता येतील. पंकजाताईंना केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.



महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ बीड शहरातील स्वराज्य नगर परिसरात शुक्रवारी (दि.२०) कॉर्नर बैठक पार पडली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, नगरसेवक गणेश वाघमारे, सरपंच अतुल मुंडे, शरद गदळे, दत्ताप्रसाद सानप, आमेर सिद्दीकी, अतुल काळे, दिशांत मोराळे, विकास यादव, माजेद कुरेशी, पवार, गणेश भोसले, राहुल मुंडे, संतोष पाळवदे, राजाभाऊ क्षीरसागर आदी उपस्थित होते.डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, केंद्र सरकारच्या विविध योजना बीड शहरात देखील राबविल्या जात आहेत. त्यात प्रामुख्याने पंतप्रधान घरकुल योजना राबविली जात आहे. या माध्यमांतून शहरात ३ हजार गोर गरीब जनतेला हक्काचे घरकुल मिळाले. केंद्र सरकारच्या माध्यमातून शहरातून जाणाऱ्या मुख्य रस्त्यांची कामे झाली आहेत. महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून देऊन केवळ खासदार म्हणून नाही तर मंत्री म्हणून संसदेत पाठवायचे आहे. त्यांच्या माध्यमातून बीड शहरात मोठ्या प्रमाणात विकासाची कामे आणायची आहेत. ती कामे पूर्ण करून देण्याची जबाबदारी ही आमची आहे, त्यासाठी पंकजाताईंना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.आवाहनाला प्रतिसाद देत स्थानिक नागरिकांनी देखील आपण आतापर्यंत आमच्या प्रभागात विविध विकासकामे करून न्याय दिला आता याची परतफेड आम्ही पंकजाताई मुंडे यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला. या कॉर्नर बैठकीला स्थानिक नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मोदींचा राजेश विटेकरांना शब्द

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

परभणी । प्रतिनिधी




काम करत रहा, लढत रहा तुमच्या त्यागाचं फळ तुम्हाला निश्चितपणे मिळेल, असा शब्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परभणी लोकसभेतून निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले परंतु, पक्षनिष्ठेसाठी माघार घेतलेले राष्ट्रवादी नेते राजेश विटेकर यांना महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.२०) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची परभणीतील लक्ष्मी नगरीत जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी सभा संपल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा राजेश विटेकर यांच्याशी संवाद करुन दिला. विटेकर यांच्या योगदानाची व त्यांनी केलेल्या त्यागाची माहिती देत ओळख करुन दिली. विटेकर यांनी याआधी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून या ठिकाणाहून निवडणूक लढवली होती, तेव्हा वंचितने केलेल्या मत विभाजनामुळे चाळीस हजार मतांनी त्यांचा पराभव झाला, यावेळीही ते इच्छुक असतांना व त्यांचा विजय निश्चित असतांनासुध्दा त्यांना उमेदवारी मिळाली नाही, पक्षनिष्ठेसाठी त्यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांना मोकळ्या मनाने पाठींबा दिला व त्यांच्या विजयासाठी ते प्रचारात हिरीरीने पुढाकार घेत आहेत, असे फडणवीस यांनी पंतप्रधान मोदी यांना सांगितले. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी राजेश विटेकर यांना जवळ बोलावून पाठीवर हात थोपटत त्यांचे कौतूक व अभिनंद केले. 'तुम काम करते रहो, लढते रहो, हम तुम्हारे साथ है । आपके बलिदान का फल आपको जरून मिलेगा', असा शब्दही मोदी यांनी यावेळी विटेकरांना दिला.

दरम्यान, पंतप्रधान मोदी व विटेकर यांच्यामध्ये झालेल्या संवादाची क्लिप समाज माध्यमावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे असंख्य कार्यकर्ते आणि राजेश विटेकर समर्थकांच्या व्हॉट्सअप स्टेटसवर आणि सोशल मीडियामध्येही रील सध्या धुमाकूळ घालत आहे.

# एक खोट बोलल्यामुळे शंभर खोटे बोलावे लागतेय-आ.आशिष शेलार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

उध्दव ठाकरे हे एक खोटे बोलल्यामुळे त्यांना आता शंभर वेळा खोटे बोलावे लागते आहे, असा टोला मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ड आशिष शेलार यांनी लगावला.

आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्री करण्याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता अशा आशयाचे विधान उबाठा गटाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांनी केले होते त्यावर माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आमदार ड आशिष शेलार म्हणाले की, गेले दोन चार वर्षे उध्दवजी म्हणत होते की, मी आणि अमितशाह यांच्यात चर्चा झाली. अमितशाह यांनी मला मुख्यमंत्री पदाबाबत शब्द दिला होता, असा दावा त्यांनी केला होता. तर आता त्यांनी दुसरा दावा केला आहे की, माझी आणि देवेंद्रजींची चर्चा झाली. वर्षानुवर्षे दावे ते बदलत आहेत.

तशी कोणतीही चर्चा झाली नाही हे अमितभाई शाह यांनी स्पष्ट केले त्यामुळे उध्दव ठाकरे यांचे हे खोट विधान ना जनतेला पटले, ना शिवसैनिकांना पटले, त्याचा पुरावा ही त्यांच्याकडे नाही त्यामुळे आता ते आणखी एक खोटे बोलत आहेत. माझी आई मला सांगत असे की, खोटे कधी बोलू नको, एक खोटे बोलले की पुढे शंभर खोटे बोलावे लागते. उध्दव ठाकरे आपले एक खोटे पचवण्यासाठी आणखी एकदा खोटे बोलले आहेत. आणखी त्यांना कितीवेळा खोटे बोलावे लागणार आहे असा प्रश्न आहे. दुसरा महत्वाचा मुददा म्हणजे केंद्रीय मंत्री अमितभाई शाह यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले होते की, पुत्र प्रेमातून शिवसेनेत फुटली. आज याला पुष्टी मिळाली असून शिवसैनिकाला मुख्यमंत्री पदी बसवायचे आहे असे उध्दव ठाकरे बोलत जरी असले तरी प्रत्यक्षात आदित्यलाच मुख्यमंत्री करायचे पोटात होते, त्यांच्या मनातील चांदणे आता समोर आले आहे, असेही आमदार ड आशिष शेलार म्हणाले. विशेष म्हणजे ते जे वारंवार खोटे बोलत आहेत त्याचे कुठलेही परिस्थितीजन्य पुरावे त्यांच्याकडे नाहीत, भाजपाकडे असे अनेक पुरावे असून या मुद्दयावर उध्दव ठाकरेच खोटे बोलत आहेत हेच पुन्हा पुन्हा सिध्द होते आहे असेही आमदार ड आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

# राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती पतसंस्था अपहाराची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून व्हावी

## गुन्हे दाखल झालेल्या संचालकांना अटक करण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेच्या अपहाराची व्याप्ती मोठी असल्याने सदर प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडून व्हावी, गुन्हे दाखल झालेल्या संचालकांना तातडीने अटक करावे व या प्रकरणात सर्व संचालक दोषी असल्याने त्यांना सहआरोपी करण्याची मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा १ मे महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण करण्याचा इशारा समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिला आहे.



कान्हूर पठार (ता. पारनेर) येथील राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत मोठ्या प्रमाणात अपहार झाला आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल होवून देखील आरोपींना जाणीवपूर्वक अटक करण्यात आलेली नाही. या पतसंस्थेत अपहाराची व्याप्ती मोठी असून, यामध्ये इतर संचालक मंडळही दोषी आहे. पतसंस्थेचा अपहार उघडकीस येण्यासाठी त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा यांच्याकडून करण्याची गरज असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या पतसंस्थेत सहकार अधिनियमांचे उल्लंघन करून अनियमितता करण्यात आली आहे. पतसंस्थेचे चेअरमन, संचालक मंडळ व कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात अपहार केला आहे. या अपहाराची रक्कम ५० लाखापेक्षा अधिक आहे. गेल्या तीन वर्षापासून तक्रारीचा पाठपुरावा करून आज अखेर चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. पारनेर तालुक्यातील सर्वसामान्य व्यक्तींनी आपल्या जीवनाची पुंजी पतसंस्थेत ठेव म्हणून ठेवली होती. गेल्या दीड वर्षापासून हेलपाटे मारून देखील ठेवीदारांना ठेवी मिळालेल्या नाहीत. काही ठेवीदारांनी आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. या पंतसंस्थेच्या गैरव्यवहारात आरोपी असलेल्या पोपट ढवळे याने पारनेर तालुक्यातील सहकार क्षेत्रात असणाऱ्या पतसंस्था व मल्टीस्टेट संस्थांना मोठ्या प्रमाणात अडचणीत आणले असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तर ढवळे यांच्यामुळे काही ठेवीदारांनी आत्महत्या केल्या असून, त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल व्हावा. तसेच संपदा पतसंस्थेप्रमाणे राजे शिवाजी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेतील सभासद व ठेवीदार यांना न्याय देण्याचे निवेदनात म्हंटले आहे.

# ना.छगन भुजबळ यांच्या उमेदवारीवरून महाराष्ट्रातील ओबीसी समाज आक्रमक

## येणाऱ्या निवडणुकीत ओबीसी समाज तुम्हाला धडा शिकवेल- नागेश गवळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी



१९३१ साली जनगणनेनुसार देशात ५४% देशाच्या लोकसंख्येच्या निम्म्यापेक्षा जास्त ओबीसी समाज आहे. नाशिक मध्ये नामदार छगन भुजबळ यांनी उमेदवारी स्वतःहून मागे घेण्याची भूमिका घेतली.ही ओबीसी समाजासाठी क्लेशदायक बाब आहे. महाराष्ट्रात केवळ एका समाजाचा दबावाला बळी पडून महायुतीचे सरकार ना.भुजबळ साहेबांना उमेदवारी नकारात असेल तर महायुतीच्या सरकारला एकट्या समाजाची मतांची गरज आहे का.ओबीसी समाजाच्या मतांची गरज वाटत नाही काय? हा थेट सवाल सर्व पक्षांना केला आहे. नामदार छगन भुजबळ साहेबांच्या महाराष्ट्राच्या सीमा अडवायचा तुम्ही प्रयत्न करीत असाल तर आज फक्त उमेदवारी अर्ज भरावयाचे काम सुरू आहे मतदान होण्याचे काम बाकी आहे. जेव्हा ओबीसी समाज अडचणीत होता तेव्हा नामदार छगन भुजबळ साहेबांनी आमच्या पाठीशी उभे राहून महाराष्ट्रात महाएल्गार मेळाव्या घेतले. देशाचे गृहमंत्री अमित शहा व पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांनी नामदार छगन भुजबळ साहेबांना उमेदवारी जाहीर केली होती. परंतु महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने नामदार छगन भुजबळ यांची उमेदवारी डावलून ओबीसी समाजावर अन्याय केला आहे. ओबीसी समाजाच्या भावना दुखावल्या आहेत.येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत ओबीसी समाज धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.असे प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते नागेश गवळी यांनी केले आहे. माळीवाडा येथे महायुती सरकारने नामदार छगन भुजबळ यांची उमेदवारी डावलल्याने सकल ओबीसी समाज व समता परिषदेच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यासमोर तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.याप्रसंगी समता परिषदेचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अंबादास गारुडकर,जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे,नाभिक संघटना जिल्हाध्यक्ष अनिल निकम,बबन भूमकर,डॉ. स्मिता तरटे, गोरख आळेकर, दत्तात्रय व्यवहारे,गणेश व्यवहारे आदी उपस्थित होते.

# अंधत्व आलेल्या ७० वर्षीय हिरा बाईला फिनिक्सने दिली नवदृष्टी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहमदनगर । प्रतिनिधी

काचबिंदूने एका डोळ्यास निर्माण झालेला दृष्टीदोष तर दोन वर्षापूर्वी मोतीबिंदूने दुसऱ्या डोळ्याला ग्रासले असताना आलेल्या अंधत्वाने व आर्थिक परिस्थिती अभावी पेचात सापडलेल्या ७० वर्षीय हिराबाई काळोखे यांच्यावर फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून काचबिंदू असलेल्या डोळ्याची शस्त्रक्रिया करुन त्यांना नवदृष्टी देण्याचे काम करण्यात आले. अंधारलेल्या जीवनाला पुन्हा दृष्टी मिळाल्याने काळोखे यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.



दुष्काळी कर्जत तालुक्यातील हिराबाई काळोखे यांना दृष्टीदोष निर्माण झालेले असताना व आर्थिक परिस्थिती बेताची आणि डोळ्यांची शस्त्रक्रिया अवघड, खर्चिक होती. त्या उपचारासाठी नागरदेवळे (ता. नगर) येथील फिनिक्सच्या मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात सहभागी झाले. त्यांनी फिनिक्सचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांची भेट घेवून संपूर्ण परिस्थिती सांगितली. बोरुडे यांनी तात्काळ डॉक्टरांना सूचना करुन त्यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी पुणे येथील के.के. आय बुधराणी हॉस्पिटलला पाठविले. त्यांच्या एका डोळ्यावर काचबिंदूची अवघड शस्त्रक्रिया करुन त्यांच्या जीवनातील अंधकार दूर करण्याचे काम करण्यात आले.शस्त्रक्रिया करुन काळोखे शहरात आले असता त्यांच्या स्वागतासाठी आलेल्या जालिंदर बोरुडे यांना त्यांनी कवटाळून घेतले. या भावनिक भेटीने उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा पाणवळ्या. फिनिक्स फाऊंडेशन घेत असलेल्या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराच्या माध्यमातून अनेक दीनदुबळ्या, कामगारवर्ग व आर्थिक दुर्बल घटकांना नवदृष्टी मिळत आहे. तर मोतीबिंदू असलेल्या दुसऱ्या डोळ्यावरही लवकरच शस्त्रक्रिया मोफत करण्याचे आश्वासन त्यांना देण्यात आले.

# संत कृपा,भक्तगण आणि सर्वांच्या कृपाशीर्वादाने श्री रामगड देवस्थानचा विकास ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर

## अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याचे किर्तनप्रसंगी भक्तांची मांदियाळी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मी ज्या ठिकाणी गुरे राखले,खेळलो बागडलो त्या ठिकाणी रस्ता नव्हता पिण्यास पाणी नव्हते.जनावरे व माणसांना एकाच विज विहरातील पाणी प्यावे लागत होते.अशा दुर्गम व माळरानावर आपण २०१० साली रामगड देवस्थानची स्थापना केली.एक लिंबाचे मोठे झाड ही या गडाची खूण होती.आज येथे सर्व शेतकऱ्यांच्या सहकार्याने रस्ता झाला.पिण्याच्या पाण्यासाठी हातपंप,कीर्तनमंडप झाला आहे.खासदार,आमदार ,राजकीय नेते,पदाधिका-यांच्या मदतीने मोठा निधी मिळालेला आहे.दानशुर भक्तांनी व शिष्यगणांनी दिलेल्या देणगीतुन अल्पावधीत श्री श्रेत्र रामगड नावारुपाला आला आहे.अल्पावधीत श्रेत्र रामगड देवस्थानचा संतकृपेने,नेत्यांच्या आणि भाविकांच्या मदतीने विकास झाला असल्याचे प्रतिपादन रामगड देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर यांनी केले.आष्टी तालुक्यातील लिंबोडी - देविनिमगाव या संत बाळुदेव महाराज यांच्या पावन भुमीत संत मदन महाराज यांच्या कृपाशीर्वादाने,राष्ट्रसंत वामनभाऊ व राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या कृपेने श्री क्षेत्र रामगड येथे सप्ताहातील काल्याचे कीर्तनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आष्टी तहसिल कार्यालयातील पेशकार भगीरथ धारक,राम महाराज,बाबुराव पाटील सुर्यवंशी,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,राजेंद्र लाड सर,ह.भ.प.हरिदास महाराज चाटे,ह.भ.प.आदिनाथ महाराज गुणारे,ह.भ.प.श्याम महाराज गव्हाणे,ह.भ.प.भरत महाराज आघाव,ह.भ.प.अशोक महाराज काकडे,ह.भ.प.नवनाथ महाराज भारती,ह.भ.प.शिवाजी महाराज फिस्के,ह.भ.प.अशोक महाराज जठार,सचिनबाप्पा गोंदकर, माजी सरपंच समाधान आंधळे,विजय घुगे,कर्डीले,हरिनाना शिंदे,डा.दादा अनारसे,बबन धोंडगे आदि सामाजिक,

राजकीय,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.रामगड येथे गाथा पारायण,रामायण व संतचरित्र कथा ज्ञानयज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह दि.१७ ते २४ एप्रिल २०२४ या कालावधीत संपन्न झाला.या सप्ताहात ह.भ.प.धर्माचार्य आजिनाथ आंधळे महाराज,रामायणाचार्य ह.भ.प.सुदाम महाराज ,ह.भ.प.उमेश महाराज पुरी,ह.भ.प.रामकृष्ण महाराज, भागवताचार्य ह.भ.प.रोहिदास महाराज,ह.भ.प.ब्रम्हचैतन्य तावरे महाराज,ह.भ.प.संजय महाराज यांचे हरिकीर्तन झाले.आष्टी तालुक्यातील देविनिमगाव.लिंबोडी या परिसरात असलेले रामगड देवस्थान सध्या चर्चेत आले आहे.या देवस्थानचे महंत विष्णु महाराज लिंबोडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली रामकथा व भव्य दिव्य सप्ताह झाला. या सप्ताहातील काल्याचे कीर्तनास हजारो



भाविकांच्या उपस्थिती होती.यावेळी ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर यांनी संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर निरुपन केले.परमार्थात शुध्द चित्ताला महत्त्व असते.शुध्द चित्त असणाऱ्या माणसात देव रहत असतो.रामगड देवस्थान १५ वर्षापुर्वी दुर्गम व रस्ता नसलेल्या ठिकाणी स्थापन केले होते.साधु संत,महंत राजकीय,सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या सहकार्य व मदतीने हे संस्थान विकसीत होत आहे.जीवन आहे तोपर्यत चांगले वागा.चांगले वागणाऱ्यांना मोक्ष तर वाईट वागणाऱ्यांना नरक प्राप्तीच असते.नामयज्ञ,सप्ताह हे पुण्यासाठी असतात.परमार्थ व संसार वेगळा नाही.दोन्ही क्षेत्रात माणसांना एकत्रीत यावे लागते.परमार्थ करण्यासाठी शुध्द भाव व ओढ लागते.आचार,विचार व तत्त्व या तीन गोष्टी एकत्रीत आले की ते मित्र होत असतात.आई -वडिलांची सेवा,गायीची सेवा आणि देशाची सेवा केली की ती देवाची सेवा होत असते.जन्मदाती माता,गोमाता आणि पृथ्वी माता या तीन माता आहेत.आईबापाची सेवा करणे म्हणजे पृथ्वी प्रदिक्षणा होत असते.याला शास्त्राचा आधार आहे.संताचे प्रमाण आहे.अनुभव नसेल तर संसार व परमार्थात ती आडचण असते.पोटाची भुक,ज्ञानाची भुक आणि धन व मानाची भुक अशा तीन भुका असतात.जीवनात काही नाही मिळले तरी खचुन जायचं नाही.वेळ निघुन जात असते.हे लक्षात ठेवा..मग नैराश्यातील माणुस देखील आत्महत्या करीत नाहीत.

**खा.डा.प्रितमताई मुंडे १० लाख रु,आ.बाळासाहेब आजबे ५ लाख व माजी आ.भीमराव धोंडे यांनी ३ लाख रु देवस्थानचे विकास कामांसाठी दिले आहेत.समाजसेवक विजय गोल्हार यांनी प्रयत्न करुन हे देवस्थान क दर्जात आणले आहे. यासर्व राजकीय नेत्यांचे ह.भ.प.विष्णु महाराज लिंबोडीकर यांनी आभार मानले.**

**यावेळी रामगड देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.विष्णु महाराज यांच्या हस्ते आदर्श पत्रकार म्हणुन जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,प्रशासाकीय सेवेतील आदर्श अधिकारी म्हणुन आष्टी तहसिल कार्यालयात अव्वल कारकुन पेशकार भगीरथ धारक आणि पशुवैद्यकीय सेवेबद्दल डा.हरिभाऊ दराडे यांचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.**

# सांगवी पाटण येथे भैरवनाथ यात्रा उत्साहात संपन्न

## दर्शन घेण्यासाठी नाद भक्तांनी केली अलोट गर्दी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे भैरवनाथ मंदिर असून येथील यात्रेमध्ये २२ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पैठण,नागतळा येथून आलेल्या कावडीची मिरवणूक काढण्यात आली.२३ एप्रिल रोजी सकाळी वाजत गाजत शेरणी,दंडवत,लोटांगण घेऊन भाविक भक्तांनी नवस पूर्ण केले,तीन ते सहा यावेळेस मुख्य आकर्षण,बँजो,डिजे,डोल, ताशा,लेझिम,हलगी पथक,युवकांचा डान्स, भव्य दिव्य काठी मिरवणूक कार्यक्रम संपन्न झाला,रात्री सहा ते आठ यावेळेस अंबिल घुगऱ्या वाटण्याची जुनी परंपरा अजूनही कायम आहे.नंतर रात्री छबिना काढून गावात रातभर मिरवणूक काढण्यात आली,पहाटे शोभेच्या



दारूची आतिश बाजी करण्यात आली, यावेळी बघणाऱ्यांच्या डोळ्याचे पारने,फिटले यात्रेमध्ये खेळणी दुकाने,खाऊची दुकाने, महाप्रसादाची दुकाने असे अनेक प्रकारचे दुकाने थाटली गेली होती,यात्रेमध्ये भावी नवरदेव यांनी दर्शनासाठी जास्त गर्दी केली होती,नंतर कुस्त्याचा हंगामा संपन्न होणार झाला यामध्ये शेवटची कुस्ती उद्योजक पांडुरंग सोनवणे व यांच्या हस्ते लावण्यात आली,पंचक्रोशीतील पाटण,कोहिनी, खीळद, लिंबोडी, बावी, डोईठाण,सुरुडी, धामणगाव, कारखेल, लमाणतांडा, पुणे, मुंबई, अहमदनगर,तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविक भक्तांनी भैरवनाथांचे दर्शन घेतले,अशाप्रकारे सांगवी पाटण गावची यात्रा गुण्यागोविंदाने,मिळून मिसळून साजरी झाली.

# सिंदखेड राजा मतदार संघात आदर्श सखी मतदान केंद्राची स्थापना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

विधानसभा मतदारसंघात बुलढाणा लोकसभा निवडणुकीसाठी दिनांक २५ एप्रिल २०२४ रोजी, मा.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघात पहिल्यांदाच आदर्श सखी मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे.

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघामध्ये एकूण ३३६ मतदान केंद्रे आहेत, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी होणाऱ्या मतदानासाठी आदर्श सखी मतदान केंद्र सज्ज झाले आहे, पंचायत समिती बांधकाम विभाग सिंदखेडराजा येथे हे मतदान केंद्र असून जवळपास १२०० मतदारांची येथे नोंद आहे. मा. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा.




संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षी हा नाविन्य प्रयोग करण्यात आला आहे, आदर्श सखी मतदान केंद्रासोबत आदर्श दिव्यांग मतदान केंद्र १ , आदर्श युवक मतदान केंद्र ६ स्थापन केले आहेत.आदर्श सखी मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्ष नंदा काळे या आहेत, त्यांच्या सहकारी सखी म्हून कृष्णा ईल्लरकर,सीमा तांबेकर, वर्षा कवाणकर,एस.एम. नागलोत तलाठी,ए.एस. गिरणारे तलाठी,सीमा भुतेकर महिला पोलीस,सविता मेहेत्रे,प्रिया राऊत इत्यादी सखी काम करत आहेत.तहसीलदार सिंदखेड राजा प्रवीण धानोरकर, तहसीलदार देऊळगाव राजा वैशाली डोंगरजाळ, मा. नायब तहसीलदार सिंदखेड राजा मनोज सातव, मा. नायब तहसीलदार डॉ. अस्मा मुजावर, मा. नायब तहसीलदार नितीन बढे,मा. गटविकास अधिकारी देऊळगाव राजा मुकेश महोर, मा. गटविकास अधिकारी सिंदखेडराजा डॉ. श्रीकृष्ण वेणीकर, मुख्याधिकारी सिंदखेडराजा प्रशांत व्हटकर, मा. मुख्याधिकारी देऊळगाव राजा अरुण मोकळ इत्यादी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन या मतदान केंद्राला लाभत आहे.

### मलकापूर शहरातील मुख्य निमवाडी चौका मध्ये मिळणाऱ्या

# दोन रस्त्यावर एकेरी मार्ग,नो पार्किंग झोन करण्यात यावे, नागरिकांची मागणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

मलकापूर शहरातील नीमवाडी चौकातून दोन मुख्य मार्ग जात आहे रेल्वे स्टेशन रोड व सिनेमा रोड वर वाहतूक जास्त असल्यामुळे रस्त्यावरील अतिक्रमण काढून एकेरी मार्ग करण्यासाठी अनेक नागरिकाची मागणी आहे या कडे न प प्रशासनाने लक्ष देण्याची नितांत गरज आहे

निमवाडी चौकातून दोन मुख्य रोड अरुंद असल्यामुळे या ठिकाणी बाजाराच्या दिवशी वाहन धारकांना आणि पुरुष व स्त्रिया यांना बाजारात ये जा करणे जिकरीचे होत आहे या मुळे स्त्रियांना धक्का लागून वाद सुद्धा घडलेले आहे

यामध्ये अनेक वेळा गटबाजीने भांडणही होताना निर्दशनास येत आहे याशिवाय स्थानिक ठिकाणच्या दुकानदारांनी आपल्या दुकानाच्या समोर अतिक्रमण वाढवल्यामुळे या रस्त्याची रुंदी कमी झालेली आहे त्यामुळे अनेक वेळा नागरिकांना या रस्त्यावरून आवागमन करत असताना तारेवरची कसरत करावी लागत आहे

प्रत्येक दिवशी बाजारामध्ये अनेक वेळा ट्राफिक जाम झाल्याचे चित्र ही निदर्शनात आले आहे त्यामुळे शहरातील स्थानिक ठिकाणचे नागरिक यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे म्हणून नगरपरिषद प्रशासन यांनी वेळीच उपाययोजना करण्याची गरज आहे अन्यथा एखाद्या वेळेस मोठ्या घटनेला सामोरे जावे लागेल अशी चर्चा स्थानिक नागरिकाकडून व्यक्त होत आहे.

निमवाडी चौकात वर्दळ वाढली असून बाजारात खरेदी करण्यासाठी येत असलेले ग्राहक आपली वाहने आमचे दुकाना समोर व भर रस्त्यातच उभी करतात हटविन्यास संगीतले तर शाब्दिक वाद घालतात तसेच या मुख्य चौकातून दोन मुख्य रस्ते असल्यामुळे ट्रॅफिक ही जाम होत असते म्हणून या ठिकाणी एकपदरी रस्ता व एकेरी वाहतूक तसेच नीमवाडी चौक परिसर नो पार्किंग झोन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**डॉ.अशोक नाहर**
**दुकानदार रहवासी**

# भिस्तबाग जिल्हा परिषदेत शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप

## गुणवंत विद्यार्थ्यांचा स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्काराने सन्मान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरालगत असलेल्या भिस्तबाग जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करुन वेदांत विकास वजन व जय नागनाथ काजळकर यांना स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

अद्यावत व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या या जिल्हा परिषद शाळेचे भौतिक सुविधांनी रुप पालटले असताना परिसरातील विद्यार्थ्यांचा ओढा शाळेकडे वाढला आहे. इयत्ता पहिलीसाठी प्रवेश घेतलेल्या नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. गुणवंत व स्टुडंट्स ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी सहशिक्षिका सुरेखा वाघ, शितल आवारे, योगिता वाघमारे, अहिल्या सांगळे आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे स्वागत करुन शाळेबद्दल मनोगत व्यक्त केले. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी इतर शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तर शाळेसाठी छत्रपती संभाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली.

अनिता काळे म्हणाल्या की, मुलांना शाळेतून जीवनावश्यक शिक्षण मिळणे सर्वात महत्त्वाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणातून भारताचा सक्षम नागरिक घडणार आहे. शिक्षणाबरोबरच मुलांना संस्कार व महापुरुषांचे विचार रुजवणे आवश्यक आहे. त्याच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शिक्षक झटत असतात, शिक्षणाबरोबर कौशल्य निर्माण करण्याचा शिक्षकांचा प्रयत्न आहे. उत्कृष्ट शिक्षक व त्यांना साथ देणारे पालक शिक्षण क्षेत्रात क्रांती घडवून आणू शकतात. नेतृत्व संपन्न विद्यार्थी हि राष्ट्राची संपत्ती आहे. ज्ञानसागरातील राजहंस निर्माण करुन सक्षम पिढी घडविण्याचे कार्य जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन जय काजळकर व वेदांत वजन यांनी केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904